असा. क्र. ३२ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, जुलै ३, २००४ / आषाढ १२, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश .. .. .. .. २९८–३०२

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ जुलै २००४.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVII OF 2004.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

**सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७.**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

२००४ चा महा. अध्या. ४. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा दिनांक ६ मार्च, २००४ रोजी प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक १५ मार्च, २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २००४ राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात आला होता आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करण्यासाठीचे विधेयक (सन २००४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३) देखील दिनांक १७ मार्च, २००४ रोजी महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते, तथापि, राज्य विधानमंडळाच्या उक्त सत्राची त्याच दिवशी समाप्ती झाल्यामुळे उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही;



[ **किंमत** : रुपये ९-०० ]

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट वाटले आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, दिनांक १८ मे, २००४ रोजी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. १२.

**आणि ज्याअर्थी,** २४ मे, २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात आला होता आणि तरतुदी पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, २००४ (सन २००४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७) देखील दिनांक ३ जून, २००४ रोजी महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते. उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही आणि राज्य विधानमंडळाच्या अधिवेशनाची दिनांक ११ जून २००४ रोजी सत्रसमाप्ती झाली होती ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांच्या समाप्तीनंतर, म्हणजेच ४ जुलै, २००४ नंतर, सन २००४ चा, तरतुदी पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेश क्रमांक १२ अंमलात असण्याचे बंद होईल ;

**आणि ज्याअर्थी,** पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता पुढे चालू ठेवण्यासंबंधातील उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ६ मार्च, २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४४क ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४४क च्या,— १९६६ चा महा. ४१.

(क) पोट-कलम (१) मध्ये,—

(एक) खंड (दोन) नंतर " शेतीच्या प्रयोजनासाठी " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " कोणत्याही जमिनीचे खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी, किंवा

(तीन) खाजगी विकासकाने हाती घेतलेल्या क्षेत्रात स्थित असलेल्या कोणत्याही जमिनीचे विशेष वसाहत प्रकल्पासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) शर्त (ख) मध्ये, " खराखुरा औद्योगिक वापर " या मजकुरानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) शर्त (घ) मध्ये, " उद्योग " या मजकुरानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्प, " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(चार) शर्त (ङ) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, भारत सरकारकडून पर्यावरण-संवेदनशील क्षेत्र म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रास या पोट-कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.";

(ख) पोट-कलम (२) मध्ये, " खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी " या मजकुरानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्पासाठी " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ग) पोट-कलम (५) मध्ये, " खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासंबंधीची " या मजकुरानंतर " किंवा, यथास्थिति, विशेष वसाहत प्रकल्पासंबंधीची," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(घ) स्पष्टीकरणामध्ये, " किंवा औद्योगिक व्यवसाय किंवा उपक्रम " या मजकुरानंतर, " किंवा, पर्यटनस्थळ किंवा गिरीस्थान म्हणून राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील पर्यटनाचा उपक्रम," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो १ जुलै, २००० पासून समाविष्ट केला असल्याचे मानण्यात येईल ;

(ङ) विद्यमान स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण-एक असा नवीन क्रमांक दिला जाईल व नवीन क्रमांक दिलेल्या स्पष्टीकरण-एक नंतर पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण-दोन.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " विशेष वसाहत प्रकल्प " याचा अर्थ, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींखाली, शासनाने विशेष वसाहतीच्या विकासासाठी तयार केलेल्या विनियमांखालील एक किंवा अनेक विशेष वसाहत प्रकल्प, असा आहे.". (१९६६ चा महा. ३७.)

**३.** उक्त संहितेच्या कलम ३२८ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (सोळा-क) मध्ये, " जमिनीचा खराखुरा औद्योगिक वापर " या मजकुरानंतर " किंवा विशेष वसाहत प्रकल्पासाठी वापर " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२८ ची सुधारणा.)

**४.** (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ हा याद्वारे मागे घेण्यात आला आहे. (२००४ चा महा. अध्या. १२.) (सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ मागे घेऊन त्याचे निरसन व व्यावृत्ती.)

(२) अशा प्रकारे उक्त अध्यादेश मागे घेण्यात आला असला तरीही, पुढे चालू ठेवण्यासंबंधीच्या उक्त अध्यादेशाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या उक्त संहितेअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही, या अध्यादेशाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या, उक्त संहितेच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## निवेदन

औद्योगिक वाढीला चालना देण्याच्या आणि उद्योजकांना महाराष्ट्र राज्यामध्ये उद्योगधंदे सुरू करण्याकरिता प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र शासनाने १९९३ चे नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले आहे. उक्त औद्योगिक धोरणाचा एक भाग म्हणून, संबंधित जमीन एखाद्या औद्योगिक क्षेत्रात स्थित असल्यास तिचे खऱ्याखुऱ्या औद्योगिक वापरासाठी (*bona fide* **industrial use**) रूपांतर करण्याकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलमे ४२ व ४४ अन्वये घ्यावयाच्या जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीची आवश्यकता असणार नाही, अशी तरतूद करण्यासाठी, सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ याद्वारे, उक्त संहितेच्या कलम ४४क मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. खराखुरा औद्योगिक वापर म्हणून समजल्या जाणाऱ्या उपक्रमांचा अंतर्भाव उक्त कलम ४४क च्या **स्पष्टीकरणा**मध्ये करण्यात आलेला आहे.

२. सन १९९९ मध्ये, महाराष्ट्र शासनाने " नवीन पर्यटन धोरण " जाहीर केले असून त्यामध्ये पर्यटनाला उद्योगाचा दर्जा दिलेला आहे. राज्यातील पर्यटन उद्योगाला १९९३ च्या नवीन औद्योगिक धोरणाचे सर्व लाभ मिळवून देण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने पर्यटन स्थळ किंवा गिरीस्थान म्हणून अधिसूचित केलेल्या क्षेत्रांतील पर्यटनाच्या उपक्रमांचा, " खराखुरा औद्योगिक वापर " या शब्दप्रयोगामध्ये स्पष्टपणे समावेश करणे राज्य शासनाला इष्ट वाटले ; आणि त्या प्रयोजनासाठी उक्त कलम ४४क च्या स्पष्टीकरणामध्ये सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याद्वारे १ जुलै, २००० पासून भूतलक्षी प्रभावाने योग्य ती सुधारणा करण्यात आली.

३. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या तरतुदींन्वये शासनाने विशेष वसाहतींच्या विकासाकरिता केलेल्या विनियमांखालील विशेष वसाहत प्रकल्पांचा शीघ्रतेने विकास करण्याच्या दृष्टीने खाजगीकरण व खाजगी क्षेत्राचा सहभाग या संकल्पनादेखील शासनाने तत्त्वतः स्वीकारल्या आहेत, तसेच शेतजमिनीचे, खाजगी विकासकांनी राज्यात हाती घेतलेल्या, विशेष वसाहत प्रकल्पांच्या वापरासाठी रूपांतर करण्याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलमे ४२ व ४४ अन्वये घ्यावी लागणारी जिल्हाधिकाऱ्याची परवानगी आवश्यक असणार नाही आणि उक्त कलम ४४क च्या तरतुदी, भारत सरकारकडून, वेळोवेळी अधिसूचित करण्यात आलेल्या, पर्यावरण-संवेदनशील क्षेत्राला लागू होणार नाहीत, अशी तरतूद करण्याकरिता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ४४क मध्ये देखील सन २००४ चा उक्त महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ द्वारे सुधारणा करण्यात आली होती.

४. त्यानंतर माननीय राज्यपालांनी, दिनांक १५ मार्च, २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन बोलाविले होते आणि उक्त सन २००४ चा महा. अध्या. ४ दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात आला होता आणि उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमामध्ये रूपांतर करण्यासाठी, विधानसभेमध्ये दिनांक १७ मार्च, २००४ रोजी, सन २००४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ हे विधेयक मांडण्यात आले होते. तथापि, दिनांक १७ मार्च, २००४ रोजी राज्य विधानमंडळाची सत्रसमाप्ती झाल्यामुळे, उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही. दिनांक १५ मार्च, २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे पुन्हा अधिवेशन भरले होते आणि त्यामुळे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश दिनांक २५ एप्रिल, २००४ नंतर जारी असण्याचे बंद झाले असून शासनाला उक्त अध्यादेशाच्या तरतुदी, सदर अध्यादेश पुनः प्रख्यापित करून, अंमलात असणे चालू ठेवणे इष्ट वाटले, म्हणून दिनांक १८ मे, २००४ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ प्रख्यापित केला होता.

५. त्यानंतर माननीय राज्यपालांनी दिनांक २४ मे, २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन बोलाविले होते आणि राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्यानंतर, तरतुदी पुढे चालू ठेवण्यासंबंधीचा अध्यादेश, उक्त राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्यात आला. तसेच, तरतुदी पुढे चालू ठेवण्यासंबंधीचा उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी सन २००४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ म्हणून, दिनांक ३ जून, २००४ रोजी एक विधेयकही महाराष्ट्र विधानसभेमध्ये मांडण्यात आले होते. दिनांक ११ जून, २००४ रोजी उक्त अधिवेशनाची समाप्ती झाल्याने उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही. दिनांक २४ मे, २००४ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा भरल्याने, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (क) द्वारे, तरतूद केल्याप्रमाणे, दिनांक ४ जुलै, २००४ नंतर उक्त अध्यादेश प्रवर्तनात असण्याचे बंद होईल आणि उक्त पुढे चालू ठेवणाऱ्या अध्यादेशाच्या तरतुदी प्रवर्तनात ठेवणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

६. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २००४ याच्या तरतुदी अंमलात असणे चालू रहावे याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कारवाई करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २ जुलै २००४.

**मोहम्मद फज़ल,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ५२ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शनिवार, जुलै ३, २००४/आषाढ १२, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment and Continuance) Ordinance, 2004 (Mah. Ord. XVII of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment and Continuance) Ordinance, 2004 (Mah. Ord. XVII of 2004), published under the authority of the Governor)].

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 3rd July 2004.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVII OF 2004.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.*

WHEREAS the Governor of Maharashtra had promulgated the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2004 on the 6th March 2004 ;

Mah. Ord. IV of 2004.

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 15th March 2004, the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2004 was laid before both Houses of the State Legislature and a Bill (L. A. Bill No. III of 2004) for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was also



[किंमत : रुपये ४-००]

introduced in the Maharashtra Legislative Assembly on the 17th March 2004, however, the said Bill could not be passed as the said Session of the State Legislature was prorogued on the same day ;

AND WHEREAS it was considered expedient to continue the operation of the provisions of the said Ordinance and, therefore, the Maharashtra Land Revenue Code (Amendment and Continuance) Ordinance, 2004 was promulgated by the Governor of Maharashtra on the 18th May 2004 ; Mah. Ord. XII of 2004.

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 24th May 2004, the said Ordinance was laid before both Houses of the State Legislature and the Maharashtra Land Revenue Code (Amendment and Continuance) Bill, 2004 (L.A.Bill No. VII of 2004), for replacing the said Continuance Ordinance by an Act of the State Legislauture was also introduced in the Maharashtra Legislative Assembly on the 3rd June 2004. The said Bill could not be passed as the Session of the State Legislature was prorogued on the 11th June 2004 ;

AND WHEREAS as provided by article 213(*2*)(*a*) of the Constitution of India, the said Continuance Ordinance No. XII of 2004 shall cease to operate at the expiration of six weeks from the date of re-assembly of the State Legislature, that is, after the 4th July 2004 ;

AND WHEREAS it is expedient to continue the operation of the provisions of the said Continuance Ordinance ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in Session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the said Continuance Ordinance, for the purposes hereinafter appearing ;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement. **1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment and Continuance) Ordinance, 2004.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 6th March 2004.

Amendment of section 44A of Mah. XLI of 1966. **2.** In section 44A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as " the said Code "),— Mah. XLI of 1966.

(*a*) in sub-section (*1*),—

(i) after clause (*ii*), for the portion beginning with the words " for a *bona-fide* industrial use " and ending with the words

"conditions, namely :—" the following shall be substituted, namely :—

"for a *bona-fide* industrial use ; or

(iii) within the area undertaken by a private developer as a special township project,

then, no permission for such conversion of use of land shall be required, subject to the following conditions, namely :—" ;

(ii) in condition (b), after the words "*bona-fide* industrial use" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(iii) in condition (d), after the words "industry" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(iv) after condition (e), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, the provisions of this sub-section shall not apply to the areas notified as the Eco-sensitive Zone, by the Government of India." ;

(*b*) in sub-section (*2*), after the words "*bona-fide* industrial use" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(*c*) in sub-section (*5*), after the words "*bona-fide* industrial use" the words "or special township project, as the case may be," shall be inserted ;

(*d*) in the *Explanation*, after the words "carried on by any person," the words "or the activity of tourism, within the area notified as the tourist place or hill station, by the State Government," shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from the 1st July 2000 ;

(*e*) the existing *Explanation* shall be renumbered as *Explanation*—I and after the *Explanation* I so renumbered, the following *Explanation* shall be added, namely :—

"*Explanation-II.*—For the purposes of this section, "special township project" means special township project or projects under the Regulations framed for Development of Special Township by the Government, under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.". Mah. XXXVII of 1966.

Amendment of section 328 of Mah. XLI of 1966.

**3.** In section 328 of the said Code, in sub-section (*2*), in clause (*xvi-a*), after the words "*bona-fide* industrial use" the words "or special township project" shall be inserted.

Repeal by withdrawal of Mah. Ord. XII of 2004 and saving.

4. (*1*) The Maharashtra Land Revenue Code (Amendment and Continuance) Ordinance, 2004, is hereby withdrawn. Mah. Ord. XII of 2004.

(*2*) Notwithstanding such withdrawal, anything done or any action taken under the said code, as amended by the said Continuance Ordinance, shall be deemed to have been done or taken under the corresponding provisions of the said Code, as amended by this Ordinance.

## STATEMENT

With a view to promote industrial growth and to encourage industrialists to start industries in the State of Maharashtra, the State Government has announced the new industrial policy of 1993. As a part of the said industrial policy, section 44A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 has been amended by the Maharashtra Act No. XXVI of 1994, so as to provide that no permission of the Collector under sections 42 and 44 of the said Code shall be required for the conversion of the use of land for *bona-fide* industrial use, if the land in question is situated within an industrial zone. The activities to be considered as " the *bona-fide* industrial use " have been incorporated in the *Explanation* to the said section 44A.

2. In the year 1999, the Government of Maharashtra has declared the " new tourism policy " in which tourism has been assigned the status of an industry. In order to extend all the benefits of the new industrial policy of 1993 to the tourism industry in the State, the State Government considered it expedient to expressly include tourism activities within the areas notified by the State Government as a tourist place or hill station, in the expression " *bona-fide* industrial use ", and for that purpose by Mah. Ord. No. IV of 2004 suitably amended the *Explanation* to the said section 44A, with retrospective effect, from the 1st July 2000.

3. The Government also having accepted, in principle, the concept of privatisation and private participation for achieving expeditious development of special township projects under the Regulations for Development of Special Township made by the Government under the provisions of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, section 44A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 was also amended by the said Mah. Ord. IV of 2004 to provide that the permission of the Collector under sections 42 and 44 shall not be required for conversion of the agricultural land for the use of special township projects undertaken by private developers in the State ; and that the provisions of the said section 44A shall not apply to the Eco-sensitive Zones notified by the Government of India, from time to time.

4. Thereafter, the Session of the State Legislature was convened by the Hon'ble Governor on the 15th March 2004 and the said Mah. Ord. No. IV of 2004 was laid before both the Houses and a Bill for converting the said Ordinance into an Act of the State Legislature was introduced in the Legislative Assembly as L. A. Bill No. III of 2004 on the 17th March 2004. However, the said Bill could not be passed, as the Session of the State Legislature was prorogued on

the 17th March 2004. As the State Legislature had re-assembled on the 15th March 2004, as provided by article 213(2)(a) of the Constitution of India, the said Ordinance ceased to operate after the 25th April 2004, and it was considered expedient by the Government that the provisions of the said Ordinance should be continued by re-promulgation of the Ordinance, the Mah. Ord XII of 2004 was promulgated by the Governor of Maharashtra on 18th May 2004.

5. Thereafter, the Session of the State Legislature was convened by the Hon'ble Governor on the 24th May 2004 and upon the re-assembly of the State Legislature, the said Continuance Ordinance was laid before both Houses of the State Legislature and a Bill for converting the said Continuance Ordinance into an Act of the State Legislature was also introduced in the Maharashtra Legislative Assembly as L.A. Bill No. VII of 2004 on the 3rd June 2004. The said Bill could not be passed as the said Session of the State Legislature was prorogued on 11th June 2004. As the State Legislature had re-assembled on the 24th May 2004, as provided by article 213(2) (a) of the Constitution of India, the said Continuance Ordinance would cease to operate after the 4th July 2004, and Government of Maharashtra considers it expedient to continue the operation of the provisions of the said Continuance Ordinance.

6. As both Houses of the State Legislature are not in Session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to continue the provisions of the Maharashtra Land Revenue Code (Amendment and Continuance) Ordinance, 2004, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 2nd July 2004.

MOHD. FAZAL,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. C. JOSHI,
Principal Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई